# खनिजासंबंधी संक्षिप्त प्रस्तावना, जिल्हा सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये लोहखनिज, मॅगनीज, सिलीका सँड, बिच सँड बॉक्साईट, क्रोमाईट / ग्राफाईट, फायर क्ले, फेल्सफार क्ले , इलेमेनाईट गार्नेट / मॅग्नेटाईट, झिरकॉन इ. प्रमुख खनिजाचे साठे उपलब्ध आहेत. सन १९६० सालापासुन मौजे रेडी, ता. वेंगुर्ला येथे मे. गोगटे मिनरल्स, बेळगांव व मे. न्यु. इंडीया मायनिंग कार्पोरेशन लि. मुंबई यांचे सुमारे १५ ते २० लोहखनिज खाणी मंजुर झालेल्या होत्या. सन १९६० पासुन त्या ठिकाणी लोहखनिज उत्खनन सुरु होते. त्यावेळी लोहखनिज आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर मागणी होती. सन १९९२-९३ पर्यंत या खाणीचे खाणकाम सुरळीत सुरु होते व त्यापासुन शासनास रॉयल्टीच्या रुपाने महसुल प्राप्त झाला होता. मौजे रेडी येथील लोहखनिजाची ग्रेड ६० ते ६२ टक्के इतकी होती. सन १९९३ पासुन लोहखनिजास आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर मागणी अचानक कमी झाल्यामुळे या लोहखनिज खाणी बंद पडल्या. पुन्हा सन २००३ पासुन लोहखनिजाला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर मागणी वाढल्याने या खाणी पुर्ववत सुरु करण्यात आल्या. लोहखनिजाची निर्यात प्रामुख्याने चीन, जपान, रशिया इ. देशांना होत आहे.

सिलीका सँड हे खनिज प्रामुख्याने फोंडा, कासार्डे, वाघेरी, तिवरे, तेंडोली, वालावल, चेंदवण या गावांत उपलब्ध आहे. मौजे फोंडा, लोरे, वाघेरी, कासार्डे, ता. कणकवली व आचिर्णे, ता. वैभववाडी येथे सिलीका सँड खनिपट्टे सन १९७० पासुन मंजुर होते. महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ नागपुर, एस्मो ट्रेडींग कार्पोरेशन, कोल्हापुर, कासार्डे को- ऑपरेटीव्ह सोसायटी, कासार्डे, महाराष्ट्र मिनरल्स कार्पोरेशन, मुंबई, चंदुभाई पटेल, कोल्हापुर, सिंधुदुर्ग खनिज उद्योग लोरे, गद्रे केमिकल्स, कोल्हापुर, इ. कंपन्यांना सुमारे १५ ते २० खनिपट्टे मंजुर होते. त्यापैकी आजमितीस ११ खनिपट्टे कार्यरत असुन उर्वरीत खनिपट्टे शासनाकडुन समाप्त / व्यपगत करण्यात आलेले आहेत.

बॉक्साईट या खनिजाचे साठे प्रामुख्याने देवगड तालुक्यात असुन अद्याप शासनाकडुन बॉक्साईट एक पुर्वेक्षण अनुज्ञाप्ती वगळता , पुर्वेक्षण अनुज्ञाप्ती व खनिपट्टा कोणासही मंजुर झालेला नाही. मौजे पुरळ कळंबई, ता. देवगड येथे मे. आशापुरा कंपनी लि. मुंबई यांना पुर्वेक्षण अनुज्ञाप्ती शासनाकडुन मंजुर असुन त्यानुसार पुर्वेक्षण काम पुर्ण झाले आहे. पुर्वेक्षण झाल्यानंतर उपलब्ध साठयानुसार खनिपट्टयासाठी अर्ज करण्यात येतो.

अन्य खनिजांचे बाबतीत प्रमाण कमी असुन त्याबाबतही पुर्वेक्षण खनिपट्टा मंजुरी अर्ज प्राप्त झाले असुन त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

१) खाण व खनिजे (विकसन व विनीमयन) अधिनियम १९५७, २) खनिज सवलत नियम १९६०, ३) महाराष्ट्र खनिज ( अवैध उत्खनन , वाहतुक साठवणुक प्रतिबंध नियम ) नियम २००१ या तरतुदीनुसार प्रमुख खनिज खनिपट्टयासंबंधी कामकाज करणेंत येते. खनिपट्टा / पुर्वेक्षण अनुज्ञाप्ती मंजुरीचे अधिकार शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांना आहेत. मा. संचालक, भुविज्ञान व खनिकर्म नागपुर याजकडुन प्रमुख खनिज खनिपट्टा / पुर्वेक्षण अनुज्ञाप्ती चे बाबत सर्व प्रकारचे प्रशासकिय कामकाज हाताळले जाते. खाण सुरक्षेचे दृष्टीने कामकाज मा. संचालक, भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय,, नागपुर व इंडीयन ब्युरो ऑफ माईन्स व संचालक, डायरेक्टर जनरल सेप्टी अँड माईन्स, धनबाद यांचेकडुन सेप्टीबाबत कामकाज पाहीले जाते. इंडीयन ब्युरो ऑफ माईन्य यांचेकडुन मान्य केलेल्या तात्पुरत्या खाणकाम योजने नुसार खाणीचे कामकाज पार पाडले

जोते. व मंजुर खनिपट्टयातील खाणीचे कामकाज, उत्पादन विक्री रॉयल्टी वसुली, नवीन प्रमुख खनिज खनिपट्टा / पुर्वेक्षण अनुज्ञाप्ती अर्ज चौकशी इ. बाबतीत जिल्हा स्तरावर जिल्हा खनिकर्म अधिकारी व मा. जिल्हाधिकारी यांचेकडुन नियंत्रण ठेवणेंत येते.

## प्रमुख खनिज ( उपलब्ध गावांची यादी.)

१) आयर्न ओअर.

| तालुका | गांवे |
|---|---|
| वेंगुर्ला | रेडी, कनयाळ, टांक, सोन्सुरे. |
| दोडामार्ग | कळणे, तळकट, झोळंबे, आई, फोंडये, कालझर, आडाळी, उगाडे, वझरे. |
| सावंतवाडी | गाळेल, डिंगणे, आजगांव, गुळदुवे, तळवणे, साटेली, सातार्डा, असनीये, डोंगरपाल, तांबोळी, दाभीळ, मळेवाड, आजगांव, कोंडुरे, धाकोरे, फुकेरी, ओवळीये, सातोसे, तिरवडे, डेगवे-बांदा, केसरी-फणसवडे, पडवे-आजगांव. |

२) सिलीका सँड

| तालुका | गांवे |
|---|---|
| कणकवली | फोंडाघाट, लोरे, कासार्डे, दाबगांव, उत्तर-दक्षिण गांवठाण, आवळेश्वर, धारेश्वर, वाघेरी, तिवरे, डामरे. |
| देवगड | तांबळडेग, मिठबांव. |
| मालवण | चिंदर, वायरी, |
| वैभववाडी. | उंबर्डे, आचिर्णे, टेंबवाडी, खांबाळे, कोकीसरे. |
| कुडाळ | तेंडोली, कालावल, चेंदवण. |

३) बॉक्साईट

| तालुका | गांवे |
|---|---|
| सावंतवाडी | आंबोली. |
| देवगड | पुरळ-कळंबई, वाडा-नाडण, फणसे-पडवणे, मिठबांव-कातवण, दहिबांव, रामेश्वर, कोटकामते, गिर्ये, नारींग्रे. |

४) क्रोमाईट

| तालुका | गांवे |
|---|---|
| कणकवली | कणकवली, वागदे. |

५) ग्राफाईट.

| तालुका | गांवे |
|---|---|
| कणकवली | कणकवली. |

६) इलेमेनाईट गार्नेट / मॅग्नेटाईट / झिरकॉन.

| तालुका | गांवे |
|---|---|
| देवगड | रामेश्वर, गिर्ये-कोठारवाडी, विजयदुर्ग. |

७) फायर क्ले.

| तालुका | गांवे |
|---|---|
| मालवण | कुणकावळे. |

८) फेल्सफार क्ले.

| तालुका | गांवे |
|---|---|
| कणकवली | कसवण. |

# लोकांच्या तक्रारी.

| | | |
|---|---|---|
| १) | जमिनमालकांना नुकसान भरपाई वेळीच मिळत नाही. | शासनाकडुन खनिपट्टयाला मंजुरी मिळाल्यानंतर व त्या खनिपट्टयाचे निष्पादन झाल्यानंतर प्रत्यक्षात खाणकाम सुरु करणेपुर्वी जमिनधारकाकडुन संमतीपत्रे सादर करणे आवश्यक आहे. खनिपट्टाधारक यांना तक्रार प्राप्त झाल्यावर नुकसान भरपाई आदा करणेच्या सुचना देण्यात येतात. यासाठी संबंधीत खनिपट्टाधारक व जमिनमालक यांनी एकत्रित विचारचिनीमय करुन जमिनीचा नुकसान भरपाईचा दर ठरविणे आवश्यक आहे. नुकसानभरपाई मान्य नसल्यास,महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४८(४) प्रमाणे नुकसान भरपाई रक्कम उपविभागीय अधिकारी यांचेकडुन निश्चित करता येते. |
| २) | नुकसान भरपाईचा दर कमी प्रमाणात असतो. | |
| ३) | खाणीचे सांडपाणी, वॉशिंग प्लँटचे सांडपाणी, टाकाऊ खनिज इ. वाहुन शेतीचे / बागायतीचे नुकसानी होते. | सांडपाण्याचा निचरा संबंधीत खनिपट्टाधारक यांनी करणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे त्यांना तक्रारींचे वेळी कळविणेंत येते व असे सांडपाणी व्यवस्थित निचरा करणेची उपाययोजना करणेंत येते. |
| ४) | खाणकाम पुर्ण झाल्यावर खाणकाम खड्डे पुर्ववत बुजवुन देण्यात येत नाहीत. | खाणकाम पुर्ण झाल्यावर खाणकाम खड्डे बुजवुन जमिन पुर्ववत करणे खनिपट्टाधारकावर बंधनकारक आहे. त्यासाठी Progressive Closure Mining Plan व Financial assurance कंपनीकडुन I.B.M. मार्फत सादर करावा लागतो. |

# पुर्वपहाणी परवाना अर्जासाठी लागणारी
# (खनिज सवलत नियम - १९६० मधील फॉर्म- अ).
# आवश्यक कागदपत्रे

१) प्रती चौ.कि. मी. प्रमाणे अर्जित क्षेत्राकरिता अर्ज फी भरल्याची चलन.

२) अर्जित क्षेत्राचा नकाशा ( टोपोशिट स्केल ).

( ४ प्रती नकाशावर एकुण मागणी केलेले क्षेत्र उपलब्ध केलेले क्षेत्र, उपलब्ध नसलेले क्षेत्र वेगवेगळया रंगाने दर्शविण्यांत यावे.)

३) (अ) खनिज बकाया नसल्याचे प्रमाणपत्र.

(ब) खनिज बकाया नसल्याचे शपथपत्र.

(जर खनिज सवलती अंतर्गत पुर्वी मंजुरी असल्यास.)

(क) कंपनी / फॉर्म असल्यास प्रत्येक सदरयाचे नांवाचे शपथपत्र / प्रमाणपत्र.

४) आयकर भरल्याबाबतचे शपथपत्र.

५) राज्यात पुर्व पहाणी करिता इतरत्र मंजुर / अर्जित क्षेत्राबाबतचे शपथपत्र.

६) केंद्र शासनाकडे पुर्व परवानगीस्तव पाठविण्यास विहीत केलेल्या प्रपत्रात माहिती भरुन सादर करावी. (सहपत्र- १ ).

अर्जदार जर प्रत्यक्षात भुपृष्ठावर काम करणार असल्यास त्यांना नियमानुसार ४ मुद्यांबाबतची माहिती संबंधीत महसुल अधिका-याकडुन प्राप्त करुन अर्जासोबत जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

## पुर्वेक्षण अनुज्ञाप्ती अर्ज : ( खनिज सवलत नियम - १९६० मधील फॉर्म - ब ).
## व
## नुतनीकरण अर्ज : ( खनिज सवलत नियम - १९६० मधील फॉर्म- इ ).

## आवश्यक कागदपत्रे.

१) अर्जासोबत अर्जित क्षेत्राच्या पहिल्या चौ. कि.मी. साठी किंवा त्यांच्या भागास व त्यापुढील प्रत्येक चौ. कि.मी. किंवा त्याच्या भागास शेडयुल- II मध्ये नमुद केल्याप्रमाणे अर्ज फी.

२) आवेदीत केलेल्या क्षेत्राचा गांव नकाशा व ७/१२ (नकाशा- ५ प्रती) नकाशावर अर्जदाराने मागणी केलेले क्षेत्र, उपलब्ध क्षेत्र व उपलब्ध नसलेले क्षेत्र वेगळया रंगाने दर्शविण्यात यावे.)

३) (अ) खनिज बकाया नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

(ब) खनिज बकाया नसल्याबाबतचे शपथपत्र. (खनिज सवलत मंजुरी नसल्यास).

(क) कंपनी / फर्म असल्यास प्रत्येक सदस्याचे नांवाचे शपथपत्र / प्रमाणपत्र.

४) आयकर भरल्याबाबतचे शपथपत्र.

५) राज्यात अर्जित / मंजुर खनिज निहाय क्षेत्राची माहितीबाबत शपथपत्र.

६) खाजगी जमिन असल्यास भुपृष्ठभाडे अधिकार प्राप्त असल्याचे निवेदन.

७) संबंधित महसुल अधिका-यांचा पांच मुद्यांवरील अहवाल.

## खनिपट्टा अर्ज : ( खनिज सवलत नियम - १९६० मधील फॉर्म - आय)
## व
## खनिपट्टा नुतनीकरण अर्ज ( खनिज सवलत नियम - १९६० मधील फॉर्म - जे.)

### आवश्यक कागदपत्रे

१) अर्जाचे शुल्क भरल्याची चलन. (रुपये २५००/- ).

२) प्राथमिक खर्चाचे शुल्क भरल्याचे चलन. (रुपये १०००/-).

३) आवेदित क्षेत्राचा गांव नकाशा ( ४प्रती) व ७/१२ चे उतारे. नकाशावर अर्जदाराने मागणी केलेले क्षेत्र, उपलब्ध क्षेत्र व उपलब्ध नसलेले क्षेत्र वेगळया रंगाने दर्शविण्यांत यावे.)

४) (अ) खनिज बकाया नसल्याचे प्रमाणपत्र.

(ब) खनिज बकाया नसल्याचे शपथपत्र. ( खनिज सवलत मंजुरी नसल्यास.)

(क) कंपनी / फॉर्म असल्यास प्रत्येक सदस्याचे नांवाचे शपथपत्र / प्रमाणपत्र.

५) आयकर भरल्याबाबतचे शपथपत्र.

६) राज्यात इतरत्र कोठेही खनिपट्टा मंजुर / अर्जित असल्यास / नसल्यास त्याबाबतचे शपथपत्र.

७) पुर्वेक्षण झाले असल्यास त्याबाबतचा अहवाल / टिप्पणी.

८) खाजगी जमिन असल्यास भुपृष्ठ अधिकार प्राप्त असल्याचे निवेदन.

९) संबंधित महसुल अधिका-याचा ५ मुद्यांवरील अहवाल.

१०) प्रकल्प अहवाल, प्रकल्पाचा मनोदय असल्यास.

११) कंपनी / फर्म असल्यास डिड ऑफ रजिस्टेशन प्रत.

१२) केंद्र शासनाकडे पुर्व परवानगीस्तव पाठविण्यांत विहीत केलेल्या प्रपत्रात माहिती भरुन सादर करावी. ( सहपत्र - २ ).

नुतनीकरण अर्जासोबत या व्यतिरीक्त खाणकाम कार्यक्रम योजना संलग्नीत करणे आवश्यक आहे. तसेच भारतीय खाण ब्युरो यांचे प्राप्त अर्जावरील परिपुर्ण माहिती, अभिप्राय प्राप्त करण्यास्तव विहीत केलेल्या प्रपत्रात माहिती भरुन सादर करावा. ( सहपत्र - ३ ).